# देवाने नेहमीच आपली अभिवचने पाळली:

जुन्या करारातील ऐतिहासिक पुस्तके


मुलांना शिकविणाऱ्यांनी H3b हा अभ्यास वाचावा

## 1. ऐतिहासिक पुस्तके शिकविण्यासाठी प्रार्थना पूर्वक वचनातून तयारी करा.


**प्रार्थना:** ''प्रिय परमेश्वर देवा, भूतकाळात गतकाळातील सर्व युगांत तू आपल्या लोकांशी विश्वासू राहिलास. माझ्या मंडळीला व मला, आज आणि आमच्या नंतर आमच्या मुलाबाळांना तुझ्यावर भरवंसा ठेवण्यास शिकव''

पुढे काही अंक दिले आहेत. हे अंक त्या त्या पुस्तकातील घटना मसीहा येशूचा जन्म होण्यापूर्वी सुमारे किती वर्षे अगोदर घडल्या ते दर्शवतात. प्रत्येक पुस्तकातील प्रसिद्ध वचन पाहा. नवा करार सर्व ऐतिहासिक पुस्तकांचा कसा आधार घेतो ते वाचा.

**ऐतिहासिक पुस्तकांची काल रेखा**




1406-1383 यहोशवाने कनान देश जिंकून घेण्यासाठी इस्राएली लोकांचे यहोशवा ने नेतृत्व केले. पाहा 1:7 त्यांनी परमेश्वराचे संपूर्ण आज्ञापालन केले; तेव्हाच फक्त त्यांना विजय मिळविता आला. पाहा इब्री 11:31 मध्ये नवा करार यहोशवा 6:22-25 मधील रहाबच्या वृत्तांताचा उल्लेख कसा केलेला आहे.



**यरीहोच्या भिंती ढासळण्यास सुरुवात झाली.** पाहा यहोशवा 6:15-20

1386-1045. **शास्ते** हे इस्राएल लोकांनी देवाची अवज्ञा केली त्या 300 वर्षांच्या काळात स्थानिक पुढारी नायक आणि सोडवणूक करणारे होते. पाहा शास्ते 16:6 18:1. पाहा इब्री 11:32-33 मध्ये शास्ते 14:5-6 मधील शमशोनाचा उल्लेख आहे.

1100. **रूथ,** ह्या परराष्ट्रीय स्त्रीने इस्राएलाच्या प्रभूची आज्ञा पाळली, तिने बवाजशी लग्न केले. दावीद राजा व मसीहा येशू यांच्या पूर्वजा पैकी ती एक आहे. पाहा रूथ 1:6 पाहा मत्तय 1:5 मध्ये बवाज व रूथ ह्यांची नावे आहेत.

1100-1010. 1 **शमुवेल** यात शमुवेल संदेष्ट्याचे नेतृत्व, शौल राजाची राजवट व पतन आणि दावीदाचा उदय याविषयी तपशीलाने सविस्तर सांगितले आहे. पाहा 1 शमुवेल 15:22 पाहा प्रे. कृ. 13:22 मध्ये प्रभूने दाविदाविषयी 1 शमुवेल 13:14 मधून उच्चारलेले शब्द पाहा.

1010-970. 2 **शमुवेल** यात दावीद राजाने संपादन केलेले अनेक विजय, त्याची पातके व अपयश आणि त्याच्या राजकीय आपत्ती याबद्दल विस्ताराने तपशील दिलेला आहे. पाहा 2 शमुवेल 7:9 पाहा 2 करिंथ 6:18 मध्ये देवाने 2 शमुवेल 7:8 व 14 ह्या वचनात दावीदाची संतती करण्याचे दिलेले अभिवचन आम्हा ख्रिस्ती लोकांना लागू होते.

1011-970. 1 **इतिहास** यामध्ये दावीद राजाच्या राजवटीबद्दलचा सविस्तर तपशील आहे. पाहा 1 इतिहास 4:10. पाहा इब्री 1:5 हे येशूला लागू असलेले वचन म्हणजे 1 इतिहास 17:11 व 13 मध्ये दावीदाला दिलेले अभिवचन आहे.

970-538. 2 **इतिहास** यात शलमोनाच्या राज्याभिषेकापासून इस्राएल व यहूदातील राजांची राजवट ते यहूदाचा पाडाव आणि पारसाचा राजा कोरेश ह्याने यरूशलेमेतील मंदिर 538 मध्ये पुन्हा बांधण्याचे फर्मान काढले येथ पर्यंतचा तपशील विस्ताराने दिला आहे. पाहा 2 इतिहास 13:10 पाहा मत्तय 23:35 मधील येशूचे शब्द 2 इतिहास 24:20 व 21 वचनांची आठवण करून देतात.

970-853. 1 **राजे** यामध्ये शलमोन राजाची कारकीर्द, राष्ट्राची दोन राज्यामध्ये विभागणी, उत्तरेकडे इस्राएल तर दक्षिणेकडे यहूदा आणि एलीया संदेष्ट्याची कारकीर्द याबाबतची तपशीलवार माहिती आहे. पाहा 1 राजे 3:9. पाहा रोम 11:3 व 4 मध्ये 1 राजे 19:10,14 व 18 यातील वचने उधृत केली आहेत.

853-561. 2 **राजे** यात अलीशा संदेष्ट्याची कारकीर्द तसेच इस्राएल आणि यहूदातील नीतिमान व दुष्ट राजांची राजवट याचा तपशील विस्ताराने मांडलेला आहे. पाहा 2 राजे 19:15 इस्राएलच्या लोकांना पाडाव करून सुमारे 722 मध्ये अश्शूराला नेण्यात आले, तर सुमारे 561 मध्ये यहूदातील लोकांना बाबेलला नेले गेले. पाहा लूक 4:27 मध्ये अलीशाने सांगितल्याप्रमाणे केल्यावर अरामाचा सेनापती बरा झाला. ह्या 2 राजे 5:1-27 मधील घटनेचा उल्लेख आहे.

538-516 व 458-457. **एज्रा** बंदिवासातून परत येण्याच्या अभिवचनाविषयी सविस्तर सांगितले आहे. बंदिवासातून पहिली तुकडी जरूब्बाबेलच्या नेतृत्वाखाली आली तर दुसरी एज्राच्या. पाहा एज्रा 3:11. पाहा लूक 21:24 मध्ये येशूने एज्रा 9:7 ह्या वचनातील शब्द वापरून अविश्वासामुळे होणाऱ्या शिक्षेविषयी सांगितले.

483-473. **एस्तेर** बाबेलच्या राजाची यहूदी पत्नी एस्तेर राणी हिने बंदिवासातील यहूदी लोकांची त्यांच्या शत्रूपासून समूळ नाश होऊ नये, यासाठी केलेल्या मध्यस्थीचा तपशील येथे दिलेला आहे. पाहा एस्तेर 4:14 मत्तय 6:23 हे वचन मूर्ख राजा हेरोद ह्याने एस्तेर 5:3 व 6 मधील शब्द कसे वापरले ते सांगते.

444-425. **नहेम्या** यात नहेम्याच्या नेतृत्वाखाली यरूशलेमेला परत आलेल्या बंदिवानांचा तपशील आहे. शहराचे कोट बांधण्याचे फर्मान बाबेलचा राजा अर्तहशश्त पहिला ह्याने काढले होते. पाहा नहेम्या 8:10. पाहा योहान 6:31 मध्ये येशू नहेम्या 9:15 मधील शब्द स्वतःला लागू करतो.

**2. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवड्यातील कार्यक्रम ठरवा.**

तुमच्या विद्यार्थ्यांना पवित्र शास्त्रातील ऐतिहसिक पुस्तकांची नावे आणि मुख्य विषय शोधून त्यांचा अभ्यास करण्यास साहाय्य करा.

ऐतिहासिक पुस्तकांमधून पवित्र शास्त्रातील वीरांबद्दल माहिती मिळवा, यात यहोशवा, रूथ, गिदोन, शमशोन, दावीद, एलीया, अलीशा व नहेम्या ह्या वीरांचा समावेश आहे. यातील काही वृत्तांत तुमच्या मंडळीतील सदस्यांच्या भेटीसाठी जाल तेव्हा त्यांना सांगा.

**3. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासना सभेसाठी**

योजना आखा भाग 2 मधून तुम्ही तयार केलेल्या एखाद्या वृत्तांताचे नाटयीकरण करा वा तपशीलवार तो सांगा.

मुलांना त्यांनी तयारी केलेले कार्यक्रम सादर करण्याची संधी द्या.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी वाचा 1 शमुवेल 15:22. जुन्या करारातील पशूयज्ञ हे ख्रिस्ताच्या यज्ञार्पणाचे भाकित होते. प्रभुभोजनाप्रमाणेच तो विश्वास व पश्चात्तापी अंत:करणाशिवाय केवळ एक विधी म्हणून लोकांनी केला तर निरूपयोगी ठरतो.

दोन वा तीन जणांचे लहान गट तयार करून आजाऱ्यांसाठी, ख्रिस्ताची गरज असणारे लोकांचे गट व मंडळीचे पुढारी यासाठी प्रार्थना करा.

**पाठ करा.** यहोशवा 1:7

| **शास्तेच्या पुस्तकातून, शास्त्यांच्या काळातील, घटना व शास्ते** | **वर्षे** |
|---|---|
| इस्राएलाने कुशन रिशाथईम राजाची सेवा केली, 3:7-8 | 8 |
| अथनिएलने इस्राएलाची सुटका केल्यावर स्वास्थ लाभले, 3:7-11 | 40 |
| इस्राएलाने मवाब राजाची सेवा केली, 3:12 | 18 |
| एहूदने इस्राएलाची सुटका केल्यावर स्वास्थ लाभले, 3:12-30 | 80 |
| शमगार ने इस्राएलाची पलिष्ट्यांपासून सुटका केली. 3:31 | 1 |
| इस्राएलाने कनानाच्या राजाची सेवा केली 4:1-3 | 20 |
| दबोरा व बाराक ने सुटका केल्यावर स्वास्थ लाभले 4:1-5:3 | 40 |
| अबीमलेख इस्राएलाचा राजा 9:1-57 | 3 |
| तोलाची कारकीर्द, 10:1-2 | 23 |
| याईराची कारकीर्द, 10:3-5 | 22 |
| इस्राएल लोकांनी अम्मोनी व पलिष्ट्यांची सेवा केली, 10:8-10 | 18 |
| इफ्ताहाची कारकीर्द 108-12:7 | 6 |
| इब्सानाची कारकीर्द 12:8-10 | 7 |
| एलोनाची कारकीर्द, 12:11-12 | 10 |
| अब्दोनाची कारकीर्द 12:13-15 | 8 |
| इस्राएलाने पलिष्ट्यांची चाकरी केली. 13:1 | 40 |
| शमशोनाची कारकीर्द, 13:1-16:31 | 20 |

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net